# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१९ – २०

## साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला

## दि. ३१ जानेवारी २०२० – मा. चारूदत्त आफळे

लोकमत

चारुदत्त आफळे : साहेबरावजी बुट्टे-पाटील स्मृती व्याख्यानमाला

# प्रत्येकाने सैनिकी बाण्याने उभे राहण्याची गरज

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** सज्जनांनी संघटितपणे नियोजनबद्ध शत्रूशी कसा मुकाबला करायचा हे शिकण्याची गरज असून, सर्वच क्षेत्रांतील भ्रष्टाचार, नैराश्य, भीती दूर करायची असेल तर प्रत्येकाने सैनिकी बाण्याने उभे राहण्याची गरज असल्याचे प्रतिपादन कीर्तनकार, गायक व अभिनेते चारुदत्त आफळे यांनी केले.



"देशातील सर्व सुखं ही सुरक्षेवर अवलंबून आहेत. वस्तू आणि वास्तू विकत घेताना जशी आपण सुरक्षेची काळजी घेतो तशी देशाची काळजी करायला हवी. सैनिकी आणि शेतीची माहिती प्रत्येकाला असणे गरजेचे आहे असे सांगून १९४७ साली भारत - पाक युद्धात पराक्रम गाजविणाऱ्या राजेंद्रसिंग, सोमनाथ शर्मा, दिवाणसिंग या वीरांच्या यशोगाथा त्यांनी सांगितल्या. जगातील लष्कराच्या तुलनेत भारतीय सैनिकांनी स्वत:च्या चारित्र्याचे जतन केले असून, उगीचच कोणाला गुलाम केले नाही उलट जगातील मानवतावाद अथवा शांतीसाठी परिश्रम घेतले.

- **चारुदत्त आफळे,** कीर्तनकार, गायक व अभिनेते

ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'भारतीय सैनिकांची यशोगाथा' या विषयावर बोलत होते. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, सुशील सिंगवी, ॲड. माणिक पाटोळे, अंकुश कोळेकर, मुरलीधर खांगटे, लालचंद कर्नावट, ॲड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ.एच.एम. जरे, डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य प्रा.एस.एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ आणि विद्यार्थी उपस्थित होते.

छत्रपती शिवाजीमहाराजांनी गनिमी कावा, मुत्सद्दीपणा, हेरगिरी ही नवी युद्धकौशल्ये निर्माण करुन युद्धे ही विजयासाठी लढायची असतात याची शिकवण दिल्याचे सांगितले.

दहशतवादाला जात, धर्म, पंथ, पक्ष असे काही नसून राष्ट्रसुरक्षेच्या मंदिरात कोणत्याच जातीधर्माची चप्पल घालून येऊ नये असेही ते म्हणाले. विद्यार्थ्यांनी बलसागर भारताचे स्वप्न साकार करताना ज्या क्षेत्रात काम करता त्या क्षेत्राचे नंदनवन करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. ज्योती वाळूंज यांनी, परिचय डॉ. कीर्ती नितनवरे यांनी तर आभार काजल साकोरे हिने मानले.

Hello Pune Gramin
Page No. 5 Feb 01, 2020
Powered by: erelego.com

सकाळ

# देशाच्या सुरक्षेला प्राधान्य : आफळे

**राजगुरुनगर, ता. १ :** देशाच्या सुरक्षेसाठी आणि शिक्षणाच्या मंदिरातही पक्ष, जात, धर्म, संघटना या गोष्टी बाजूला ठेवणे, हीच हुतात्मा जवानांना खरी श्रद्धांजली ठरेल, असे प्रतिपादन कीर्तनकार चारुदत्त आफळे यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'भारतीय सैनिकांची यशोगाथा' या विषयावर ते बोलत होते. ते म्हणाले, 'देशवासीयांची सर्व सुखे, ही सुरक्षेवर अवलंबून आहेत. वस्तू आणि वास्तू विकत घेताना जशी सुरक्षेची काळजी घेतो, तशी देशाची काळजी करायला हवी. सज्जनांनी संघटितपणे भ्रष्टाचार, नैराश्य, भीती या शत्रूंशी मुकाबला करायला शिकले पाहिजे. त्यासाठी प्रत्येकाने सैनिकी बाण्याने उभे राहण्याची गरज आहे. जवानांनी कायमच प्रतिकूल परिस्थितीत युद्धे केली आहेत. इतर देशांतील लष्कराच्या तुलनेत भारतीय जवानांनी चारित्र्याचे जतन केले.



**चारुदत्त आफळे**

जगातील मानवतावाद, शांतीसाठी परिश्रम घेतल्याचे आफळे यांनी सांगितले. प्रा. ज्योती वाळुंज यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. कीर्ती नितनवरे यांनी परिचय करून दिला. काजल साकोरे यांनी आभार मानले.

Pune, District-Today
02/02/2020 Page No. 10

# देशातील प्रत्येकाने सैनिकी बाण्याने उभे राहण्याची गरज : चारुदत्त आफळे

**राजगुरुनगर, (वार्ताहर) :** सज्जनांनी संघटितपणे नियोजनबद्ध शत्रूशी कसा मुकाबला करायचा हे शिकण्याची गरज असून सर्वच क्षेत्रातील भ्रष्टाचार, नैराश्य, भीती दूर करायची असेल तर प्रत्येकाने सैनिकी बाण्याने उभे राहण्याची गरज असल्याचे प्रतिपादन कीर्तनकार, गायक व अभिनेते चारुदत्त आफळे यांनी केलेतेहुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृतीव्याख्यानमालेत भारतीय सैनिकांची यशोगाथा या विषयावर बोलत होते.

या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, अॅड. माणिक पाटोळे, अंकुश कोळेकर, मुरलीधर खांगटे, लालचंद कर्नावट, अॅड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचाय डॉ.एच.एम.जरे, डॉ. शिल्पा



जगताप, उपप्राचार्य प्रा.एस.एन.टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे तसेच ग्रामस्थ आणि विद्यार्थी उपस्थित होते.

चारुदत्त आफळे पुढे म्हणाले की, या देशातील सर्व सुखं ही सुरक्षेवर अवलंबून आहेत. वस्तू आणि वास्तू विकत घेताना जशी आपण सुरक्षेची काळजी घेतो तशी देशाची काळजी करायला हवी. सैनिकी आणि शेतीची माहिती प्रत्येकाला असणे गरजेचे आहे असे सांगून १९४७ साली भारत - पाक युद्धात पराक्रम गाजविणाऱ्या राजेंद्रसिंग, सोमनाथ शर्मा, दिवाणसिंग या वीरांच्या यशोगाथा त्यांनी सांगितल्या.जगातील लष्कराच्या तुलनेत भारतीय सैनिकांनी स्वत:च्या चारित्र्याचे जतन केले असून उगीचच कोणाला गुलाम केले नाही उलट जगातील मानवतावाद अथवा शांतीसाठी परिश्रम घेतल्याचे सांगितले. छत्रपती शिवाजी महाराजांनी गनिमी कावा, मुत्सद्दीपणा, हेरगिरी ही नवी, युद्धकौशल्य निर्माण करून युद्ध ही विजयासाठी लढायचे असते याची शिकवण दिल्याचे सांगितले. दहशतवादाला जात, धर्म, पंथ, पक्ष असे काही नसून राष्ट्रसुरक्षेच्या मंदिरात कोणत्याच जाती धर्माची चप्पल घालून येऊ नये असेही ते म्हणाले. विद्यार्थ्यांनी बलसागर भारताचे स्वप्न साकार करताना ज्या क्षेत्रात काम करता त्या क्षेत्राचे नंदनवन करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.ज्योती वाळूंज यांनी केले, परिचय डॉ.कीर्ती नितनवरे यांनी करून दिला. आभार काजल साकोरे या विद्यार्थिनीने मानले.

# देशातील प्रत्येकाने सैनिकी बाण्याने उभे राहण्याची गरज

राजगुरुनगर : सज्जनांनी संघटितपणे नियोजनबद्ध शत्रूशी कसा मुकाबला करायचा हे शिकण्याची गरज असून सर्वच क्षेत्रातील भ्रष्टाचार, नैराश्य, भीती दूर करायची असेल तर प्रत्येकाने सैनिकी बाण्याने उभे राहण्याची गरज असल्याचे प्रतिपादन कीर्तनकार, गायक व अभिनेते चारुदत्त आफळे यांनी केले ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत भारतीय सैनिकांची यशोगाथा या विषयावर बोलत होते. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, ॲड. माणिक पाटोळे, अंकुश कोळेकर, मुरलीधर खांगटे, लालचंद कर्नावट, ॲड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ.एच.एम.जरे, डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य प्रा.एस.एन.टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे तसेच ग्रामस्थ आणि विद्यार्थी उपस्थित होते.



चारुदत्त आफळे पुढे म्हणाले की, या देशातील सर्व सुखं ही सुरक्षेवर अवलंबून आहेत. वस्तू आणि वास्तू विकत घेताना जशी आपण सुरक्षेची काळजी घेतो तशी देशाची काळजी करायला हवी. सैनिकी आणि शेतीची माहिती प्रत्येकाला असणे गरजेचे आहे असे सांगून १९४७ साली भारत – पाक युद्धात पराक्रम गाजविणाऱ्या राजेंद्रसिंग, सोमनाथ शर्मा, दिवाणसिंग या वीरांच्या यशोगाथा त्यांनी सांगितल्या. जगातील लष्कराच्या तुलनेत भारतीय सैनिकांनी स्वतःच्या चारित्र्याचे जतन केले असून उगीचच कोणाला गुलाम केले नाही उलट जगातील मानवतावाद अथवा शांतीसाठी परिश्रम घेतल्याचे सांगितले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी गनिमी कावा, मुत्सद्दीपणा, हेरगिरी ही नवी युद्धकौशल्य निर्माण करून युद्ध ही विजयासाठी लढायचे असते याची शिकवण दिल्याचे सांगितले. दहशतवादाला जात, धर्म, पंथ, पक्ष असे काही नसून राष्ट्रसुरक्षेच्या मंदिरात कोणत्याच जाती धर्माची चप्पल घालून येऊ नये असेही ते म्हणाले. विद्यार्थ्यांनी बलसागर भारताचे स्वप्न साकार करताना ज्या क्षेत्रात काम करता त्या क्षेत्राचे नंदनवन करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.ज्योती वाळूंज यांनी, परिचय डॉ.कीर्ती नितनवरे यांनी तर आभार काजल साकोरे या विद्यार्थिनीने मानले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख